# भोंदू खरातला ईडीचा दुसरा धक्का शिर्डी, कोपरगाव, संगमनेरमध्ये छापेमारी

युवावार्ता (प्रतिनिधी)

नाशिक - भोंदू अशोक खरातच्या आर्थिक गैरव्यवहारांच्या तपासात सक्तवसुली संचालनालयाच्या (ईडी) पथकाने गुरुवारी सकाळी ७ वाजता शिर्डी, कोपरगाव आणि संगमनेरमध्ये एकाच वेळी छापे टाकले. खरातच्या काळ्या पैशांचे साम्राज्य सांभाळणाऱ्या भक्तांवर ही कारवाई करण्यात आली असून, यामुळे अहिल्यानगर जिल्ह्यातील बड्या व्यावसायिकांचे धाबे दणाणले आहेत.



जानेवारीत शिर्डीतील महिला भक्ताने खरातच्या कार्यालयातील कर्मचाऱ्यावर अश्लील व्हिडिओद्वारे ब्लॅकमेल करत खंडणी मागितल्याची तक्रार दिली. याच प्रकरणाशी संबंधित व्यक्तीच्या घरावर गुरुवारी ईडीने छापा टाकला. ईडीच्या रडारवर शिर्डीतील साईमंदिरासमोरील महामार्गाच्या पूर्वेला राहणारी प्रतिष्ठित व्यक्ती होती. या व्यक्तीच्या निवासस्थानासह अन्य २ ठिकाणी झाडाझडती घेतली.

गुरुवारी झालेल्या कारवाईतही शिर्डीतील व्यावसायिक व संगमनेरमधील आणखी अशा दोघांकडून ३ कोटी रोख व मालमत्तेची कागदपत्रे हस्तगत केल्याची माहिती विशेष सूत्रांनी दिली. खरातकडील कोट्यवधींचा काळा पैसा शिर्डी आणि कोपरगाव परिसरातील रिअल इस्टेट, हॉटेल व्यवसाय आणि काही बड्या संस्थांच्या माध्यमातून 'पांढरा' (मनी लॉड्रिंग) करण्यात आल्याचे समोर आले आहे. या साखळीत काही स्थानिक 'पांढरपेशा' लोकांचाही थेट सहभाग असल्याचा संशय आहे.

# एकनाथ शिंदे हेच खरे बाळासाहेब ठाकरे आणि शिवसेनेचे वारस - आ. खताळ

## संगमनेर बस स्थानकावर शिवसेना स्थापना दिन साजरा



खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांच्या राजकीय वाटचालीला पाठिंबा देताना आमदार खताळ यांनी ठाम भूमिका मांडली. शिवसेनेचा एक जबाबदार कार्यकर्ता म्हणून ज्या ठिकाणी खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांना विरोध होईल, त्या ठिकाणी मी त्यांच्या पाठीमागे ढाल बनून उभा राहीन.

– आ. अमोल खताळ

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - शिवसेनेचे मुख्य नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे सर्व सामान्य शिवसैनिकांना न्याय देण्याचे काम करत आहेत. हिंदूहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचे काम शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे हे करत सल्याचे गौरवोद्गार आमदार अमोल खताळ पाटील यांनी काढले.

संगमनेर येथील बसस्थानक येथे शिवसेना स्थापनादिनाच्या निमित्त संगमनेर शिवसेना महायुतीच्या वतीने आयोजित कार्यक्रमात बोलताना आ. खताळ म्हणाले की, लोकशाही व्यवस्थेत जनतेने निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींवर मतदारसंघाचा विकास कामे करण्याची मोठी जबाबदारी असते. विकासकामांना गती देण्यासाठी अनेकदा कठोर निर्णय घ्यावे लागतात. जनतेच्या हितासाठी आणि मतदारसंघाच्या प्रगतीसाठी सत्तेसोबत राहून विकासाची जबाबदारी स्वीकारणे आवश्यक असल्याचे आमदार खताळे यांनी सांगितले. तुमच्यासोबत असलेले तुमचे सहा खासदार जर तुम्हाला सोडून गेले असतील, तर त्यामागे काही ना काही कारण असणारच. त्यामुळे उद्धव ठाकरे आणि संजय राऊत यांनी आपले खासदार आपल्याला का सोडून गेले याचे आत्मपरीक्षण करावे असा सल्ला आमदार अमोल खताळ यांनी दिला. शिवसेना स्थापना दिनानिमित्त झालेल्या या कार्यक्रमा तून संगमनेर तालुक्यात शिवसेना संघटना अधिक बळकट करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. तसेच आगामी काळात पक्षवाढीसह जनतेच्या विकासासाठी एकजुटीने काम करण्याचे आवाहन आमदार अमोल खताळ यांनी केले.

# अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेच्या निकषांत होणार बदल

मुंबई (वृत्तसंस्था)

महायुती सरकारने जाहीर केलेल्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजने'च्या अंमलबजावणीबाबत शेतकरी वर्गातून उमटणाऱ्या प्रतिक्रियांची राज्य सरकारने दखल घेतली आहे. या योजनेची अधिक प्रभावी आणि पारदर्शक अंमलबजावणी करण्यासाठी मार्गदर्शक सूचनांमधील निकषांमध्ये बदल केले जाणार आहेत. त्यानुसार, कर्जमुक्ती योजनेच्या नियमावलीत सुटसुटीतपणा आणण्यासाठी आणि विविध प्रशासकीय विभागांमध्ये समन्वय साधण्यासाठी तीन वेगवेगळ्या उच्चस्तरीय समित्या गठीत करण्यात आल्या आहेत. यामधील मुख्य समितीचे नेतृत्व राज्याच्या मुख्य सचिवांकडे सोपवण्यात आले असून, या त्रिसदस्यीय समितीच्या माध्यमातून पात्र शेतकऱ्यांना जास्तीत जास्त लाभ मिळवून देण्याच्या दृष्टीने निकष बदलण्याची प्रक्रिया गतिमान करण्यात आली आहेतांत्रिक अटींमुळे प्रत्यक्ष गरजू आणि नैसर्गिक आपत्तीने खचलेला सामान्य शेतकरी या लाभापासून वंचित राहू नये, हाच या निकष सुधारणेमागील मुख्य उद्देश आहे. राज्य सरकारच्या या नवीन कर्जमुक्ती योजनेअंतर्गत राज्यातील थकबाकीदार शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी दिली जाणार आहे. तसेच कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या प्रामाणिक शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंतचा प्रोत्साहनपर लाभ देण्याचे नियोजित आहे. राष्ट्रीयकृत बँका, खासगी बँका, प्रादेशिक ग्रामीण बँका आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांसह विविध प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्थांकडून घेतलेल्या कर्जांना हे धोरण लागू करण्यात आले आहे. मात्र, वारंवार कर्जमाफीचा लाभ घेणाऱ्या घटकांमुळे बँकिंग व्यवस्था कोलमडू नये, म्हणून सुरुवातीला काही तांत्रिक अटी आणि निकष घालण्यात आले होते. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील ही समिती आता याच मार्गदर्शक तत्त्वांची पुनर्रचना करणार आहे.जिल्हा पातळीवर संनियंत्रण होणार या संपूर्ण प्रक्रियेवर योग्य नियंत्रण ठेवण्यासाठी जिल्हा पातळीवरही विशेष समित्यांची स्थापना करण्यात आली आहे. सहकार आयुक्त व निबंधक (सहकारी संस्था, पुणे) यांच्याकडे या योजनेच्या अंमलबजावणीची मध्यवर्ती जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

## नाशिक - पुणे सरळ रेल्वेमार्ग...

पान १ वरून - यासाठी आ. अमोल खताळ यांच्यासह खा. अमोल कोल्हे, माजी खासदार आढळराव पाटील, माणिकराव कोकाटे यांच्यासह महामार्गावरील अनेक लोकप्रतिनिधींनी आवाज उठवला आहे. मात्र सरकारने त्याकडे दुर्लक्ष केले. संगमनेर, नारायणगाव आणि सिन्नरमध्ये रेल्वे संघर्ष समिती सुरू झाली. खासदार अमोल कोल्हे यांनी लोकसभेत तर आमदार सत्यजित तांबे यांनी विधान परिषदेत याबाबत वेळोवेळी आवाज उठवला. बाळासाहेब थोरात यांनी केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णवी यांची भेट घेतली. आ. अमोल खताळ यांनी रेल्वे मंत्रालयाकडे याबाबत पाठपुरावा केला. मात्र त्यांच्या मागणीकडे राजकीय हेतूने सोयीस्कर दुर्लक्ष करण्यात आल्याचा आरोप होत आहे.

केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी अत्यंत असंवेदनशीलपणे नाशिक पुणे सरळ रेल्वे रद्द केल्याची घोषणा करून यामधील राजकारण उघड केले. विशेष म्हणजे स्थानिक पालकमंत्री यांनी गप्प राहण्याची भूमिका घेतली. यामुळे तरुणाईचा रोष देखील वाढत आहे कारण मोठे नुकसान रे तरुणांचेच होणार आहे. नाशिक व पुणे, सिन्नर हे आयटी व एमआयडीसी साठी मोठे केंद्र आहे. यामधून मोठे रोजगार युवकांना उपलब्ध होणार आहे. येण्या जाण्याची सोय होणार आहे. त्याचबरोबर शेतमाल विक्रीसाठी मोठी बाजारपेठ मिळणार आहे असे सगळे असताना या विभागाच्या विकासाला रोखण्यासाठी हा मुद्दाम डाव खेळला जात असल्याची टीका विविध क्षेत्रातून केली जात आहे. हा सरळ मार्ग रेल्वे रद्द करण्याच्या निर्णयावर विविध पत्रकार, समाजसेवक, विचारवंत, प्राध्यापक, डॉक्टर, शिक्षक आणि शेतकरी यांनीही टीका केली आहे. पुणे येथे आम्ही नोकरीसाठी असून रेल्वेमुळे सर्व नागरिकांना सोय होणार होती अनेक युवकांना नोकरीसाठी जास्त संधी मिळणार होत्या मात्र हे स्वप्न भंगले असल्याची सिन्नर तालुक्यातील चास येथील अभियंते संजय खैरनार यांनी केली आहे. आम्ही आयटी विभागात पुणे येथे काम करत असून यामुळे आयटी मधील सर्व युवकांमध्ये मोठी नाराजी निर्माण झाली असल्याची भावना आशिष रामकर यांनी व्यक्त केली आहे. पुणे व संगमनेर, नारायणगाव, सिन्नर येथील अभियंते सोशल मीडियावर या विरोधात मोठा असंतोष निर्माण झाला असून तरुणाईने आपली मते व्यक्त केली आहे.

# कॉकरोच जनता पार्टीच्या अभिजित दीपकेंचे पंतपंधानांना पत्र

## शिक्षणमंत्र्यांची हकालपट्टी आणि १ कोटींच्या भरपाईची मागणी

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

देशभरात गाजत असलेल्या पेपर लीक प्रकरणावरून तरुणांमधील असंतोष आता आणखी तीव्र झाला आहे. २० जून रोजी दिल्लीतील जंतर-मंतर मैदानावर विद्यार्थ्यांच्या प्रस्तावित मोठ्या आंदोलनापूर्वी, 'कॉकरोच जनता पार्टी'चे संस्थापक अभिजीत दीपके यांनी शुक्रवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना एक सविस्तर पत्र लिहून थेट हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे. या पत्रात त्यांनी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या हकालपट्टीची मागणीचा पुनरुच्चार केला असून, पेपर लीकच्या तणावामुळे आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबियांना प्रत्येकी १ कोटी रुपयांची मदत देण्याचे आवाहन केले आहे.



पत्रात ११ विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांचा उल्लेख; मानसिक आरोग्य धोक्यातपंतप्रधान मोदींना लिहिलेल्या पत्रात अभिजीत दीपके यांनी अत्यंत भावनिक आणि गंभीर मुद्द्यांकडे लक्ष वेधले आहे. ते म्हणाले, ङमी आज अत्यंत जड अंतःकरणाने तुम्हाला पत्र लिहीत आहे. आपल्या देशाचे भविष्य असलेल्या युवा विद्यार्थ्यांचे जीवन आणि मानसिक आरोग्य सध्या एका मोठ्या संकटामुळे धोक्यात आले आहे.

गेल्या काही आठवड्यांत पेपर लीक आणि परीक्षांमधील अनिश्चिततेमुळे ११ विद्यार्थ्यांनी आपले जीवन संपवले आहे, ज्यापैकी ५ आत्महत्या तर गेल्या ४८ तासांत झाल्या आहेत. पुन्हा परीक्षा द्यावी लागणार की नाही, या अनिश्चिततेमुळे विद्यार्थ्यांमधील मानसिक ताण कमालीचा वाढला आहे. अनेक मध्यमवर्गीय आणि गरीब कुटुंबांनी आपल्या मुलांच्या उच्च शिक्षणाची स्वप्ने पूर्ण करण्यासाठी बँकांकडून मोठी शैक्षणिक कर्जे घेतली होती. काहींनी आपल्या आयुष्याची संपूर्ण पुंजी मुलांच्या अभ्यासावर खर्च केली. अशा परिस्थितीत मुलांचा मृत्यू झाल्याने हे सर्व कुटुंब पूर्णपणे उध्वस्त झाले आहेत. त्यामुळे केंद्र सरकारने या सर्व प्रभावित कुटुंबांना तातडीने १ कोटी रुपयांची आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणी दीपके यांनी केली आहे.

# राज्यात २४-२५ जूनपासून मान्सून सक्रिय

मुंबई (वृत्तसंस्था)

नैऋत्य मान्सून दक्षिण महाराष्ट्राच्या भागातच अडकून पडला असून ४ ते १८ जून या कालावधीत देशभरात सरासरीच्या तुलनेत ४१ टक्के पावसाची तूट निर्माण झाली आहे, अशी माहिती भारतीय हवामान विभागाने गुरुवारी दिली. या कालावधीत देशात ७२.२ मिमी अपेक्षित पावसाच्या तुलनेत केवळ ४२.६ मिमी पाऊस झाला आहे. काही दिवसांपासून रखडलेली मान्सूनची वाटचाल पुढील आठवड्यात म्हणजेच २४ ते २५ जूनपासून पुन्हा गतिमान होण्याची शक्यता आहे.पुढची वाटचाल कशी?मान्सून ८ जून रोजी दक्षिण कोकण आणि लगतच्या दक्षिण मध्य महाराष्ट्रात वेळेत दाखल झाला होता. १० ते १५ जून दरम्यान येथे पाऊस सुरू होणे अपेक्षित होते. परंतु १७-१८ जूनपर्यंत मान्सूनची पुढची चाल पूर्णपणे विस्कळीत झाली आहे. मान्सूनची उत्तर सीमा सध्या हर्णे, सोलापूर, हैदराबाद, रांची आणि मुझफ्फरपूर या भागांवरून जात असून ती स्थिर आहे. पुढील ४ ते ५ दिवसांत तेलंगणा, ओडिशा, झारखंड, बिहार आणि छत्तीसगडच्या काही भागांत मान्सून पुढे सरकण्यासाठी परिस्थिती अनुकूल आहे.२२ जूनपर्यंत तुरळक पाऊस२२ जूनपर्यंत राज्याच्या बहुतांश भागात तुरळक पावसाची शक्यता आहे. अतिवृष्टी किंवा सर्वदूर पाऊस या काळात होणार नाही.

न्यूमेरिकल वेदर मॉडेलच्या संकेतांनुसार, २४ आणि २५ जूनच्या सुमारास कोकण पट्टी आणि महाराष्ट्रात पावसाचा जोर वाढणार आहे. २५ ते २८ जूनच्या दरम्यान किनारपट्टीवर अतिवृष्टीचे ढग सक्रिय होत आहेत.पश्चिम किनारपट्टीवर २४ जूनपासून पावसाचा जोर वाढू शकतो. २६ आणि २७ जूनच्या सुमारास तो उत्तर कोकणात पोहोचेल, असा अंदाज आहे.

# सामाजिक गरज की अर्थव्यवस्थेवर वाढता भार ?




लोकशाही व्यवस्थेमध्ये जनकल्याणकारी योजना हा शासनाचा महत्त्वाचा भाग असतो. समाजातील गरीब, वंचित आणि दुर्बल घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विविध शासकीय योजना राबविल्या जातात. अन्नधान्य, शिक्षण, आरोग्य, निवारा, वीज, पाणी तसेच महिलांसाठी आणि विद्यार्थ्यांसाठी अनेक सवलतीच्या अथवा मोफत योजना सरकारकडून दिल्या जातात. मात्र गेल्या काही वर्षांत मोफत योजनांचे वाढते प्रमाण पाहता ही सामाजिक गरज आहे की अर्थव्यवस्थेवर वाढता भार? हा प्रश्न उपस्थित होऊ लागला आहे.

भारतातील मोठा वर्ग अजूनही आर्थिकदृष्ट्या दुर्बल आहे. अनेक कुटुंबे गरिबीरेषेखाली जीवन जगत आहेत. अशा परिस्थितीत मोफत धान्य, आरोग्य विमा, शिष्यवृत्ती, निवास योजना किंवा इतर आर्थिक मदतीच्या योजना या त्यांच्यासाठी आधार ठरतात. कोरोनासारख्या संकटाच्या काळात मोफत अन्नधान्य योजनेने कोट्यवधी नागरिकांना दिलासा दिला होता. त्यामुळे काही योजना या सामाजिक सुरक्षेचा महत्त्वाचा भाग असल्याचे नाकारता येत नाही.

महिलांच्या सक्षमीकरणासाठी, विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी आणि शेतकऱ्यांच्या मदतीसाठी दिल्या जाणाऱ्या काही योजना समाजाच्या विकासासाठी आवश्यक ठरतात. आर्थिक विषमता कमी करण्यासाठी आणि दुर्बल घटकांना जगण्याची संधी उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने हस्तक्षेप करणे ही लोककल्याणकारी राज्याची जबाबदारी आहे. त्यामुळे सर्वच मोफत योजनांकडे नकारात्मक दृष्टीकोनातून पाहणे योग्य ठरणार नाही.

मात्र दुसरीकडे अनेक राज्यांमध्ये आणि देशात निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मतदारांना आकर्षित करण्यासाठी मोफत योजनांची घोषणा करण्याची स्पर्धाच सुरू झाल्याचे दिसून येते. मोफत वीज, मोफत प्रवास, रोख मदत, विविध वस्तूंचे वाटप अशा योजनांवर मोठ्या प्रमाणात खर्च केला जातो. या योजनांचा निधी शेवटी करदात्यांच्या पैशातूनच उभा केला जातो. परिणामी शासनाच्या तिजोरीवर अतिरिक्त भार पडतो. जेव्हा एखादे राज्य आपल्या उत्पन्नापेक्षा अधिक खर्च करू लागते, तेव्हा कर्ज घेण्याची गरज निर्माण होते. अनेक राज्यांचे कर्ज सातत्याने वाढत असल्याचे चित्र दिसून येते. विकासकामे, पायाभूत सुविधा, शिक्षण, आरोग्य आणि रोजगार निर्मितीसाठी वापरला जाणारा निधी मोफत योजनांकडे वळविला गेला, तर दीर्घकालीन विकासावर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे अर्थतज्ज्ञ अनेकदा अशा योजनांबाबत चिंता व्यक्त करतात.

मोफत योजनांचा आणखी एक परिणाम म्हणजे काही प्रमाणात निर्माण होणारी परावलंबित्वाची मानसिकता. शासनाकडून सतत मोफत लाभ मिळत राहिल्यास काही लोकांमध्ये स्वावलंबनाची भावना कमी होण्याची शक्यता असते. समाजातील प्रत्येक सक्षम व्यक्तीला रोजगार, उद्योग किंवा कौशल्य विकासाच्या माध्यमातून स्वतःच्या पायावर उभे करण्याऐवजी केवळ मोफत सुविधा देणे हा कायमस्वरूपी उपाय ठरू शकत नाही.

याचा अर्थ असा नाही की सर्व मोफत योजना बंद केल्या पाहिजेत. उलट, गरजू आणि पात्र लाभार्थ्यांपर्यंतच योजनांचा लाभ पोहोचला पाहिजे. त्यासाठी पारदर्शक व्यवस्था आणि काटेकोर अंमलबजावणी आवश्यक आहे. शिक्षण, आरोग्य, पोषण आणि सामाजिक सुरक्षा यांसारख्या मूलभूत गरजांशी संबंधित योजनांना प्राधान्य दिले पाहिजे. मात्र केवळ राजकीय लाभासाठी आर्थिकदृष्ट्या अव्यवहार्य घोषणा करण्याचे टाळले पाहिजे.

शासनाने मोफत योजनांबरोबरच रोजगार निर्मिती, उद्योगांना प्रोत्साहन, कौशल्य विकास आणि पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक वाढविण्यावर भर दिला पाहिजे. कारण नागरिकांना मोफत सुविधा देण्यापेक्षा त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे अधिक शाश्वत उपाय आहे. स्वावलंबी नागरिक आणि सक्षम अर्थव्यवस्था यांचा समतोल साधणे हीच खरी विकासाची गुरुकिल्ली आहे.

एकूणच, मोफत योजना या काही प्रमाणात सामाजिक गरज आहेत, विशेषतः गरीब आणि वंचित घटकांसाठी. परंतु त्यांचा अतिरेक आणि राजकीय स्पर्धेतून होणारा वापर अर्थव्यवस्थेवर वाढता भार ठरू शकतो. त्यामुळे जनकल्याण आणि आर्थिक शिस्त यांच्यात योग्य समतोल राखणे आवश्यक आहे. लोकहिताच्या योजनांसोबत विकासाभिमुख धोरणे राबविली गेली, तरच समाजकल्याण आणि आर्थिक प्रगती या दोन्ही उद्दिष्टांची यशस्वी पूर्तता होऊ शकेल.

# शिक्षण व्यवस्थेतील त्रुटींविरोधात राहुल गांधींचे स्वाक्षरी अभियान

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी 'छात्रों की गूंज' (विद्यार्थ्यांची गूंज) नावाचे देशव्यापी स्वाक्षरी अभियान सुरू केले. गुरुवारी त्यांनी सांगितले की, हे अभियान पेपरफुटी, परीक्षांमधील गैरप्रकार, महागडे शिक्षण आणि बेरोजगारी यांसारख्या समस्या सरकारपर्यंत पोहोचवण्यासाठी एक व्यासपीठ बनेल. राहुल यांनी विद्यार्थ्यांना या अभियानात सहभागी होण्याचे, त्यांच्या सूचना देण्याचे आणि याचिकेवर स्वाक्षरी करण्याचे आवाहन केले.



राहुल गांधी यांनी द पोस्टमध्ये अभियानाची लिंक शेअर केली. त्यांनी लिहिले की, ज्या विद्यार्थ्यांची स्वप्ने पेपरफुटी, परीक्षांशी संबंधित समस्या किंवा वाढत्या फीमुळे प्रभावित झाली आहेत, त्यांच्यासाठी हे अभियान एक आवाज बनेल. ते म्हणाले की, जितके जास्त विद्यार्थी यात सहभागी होतील, तितक्याच ताकदीने त्यांच्या मागण्या सरकारपर्यंत पोहोचतील. राहुल गांधी यांनी व्हिडिओ संदेशात सांगितले की, कोटा येथे आयोजित 'विद्यार्थ्यांची गूंज' कार्यक्रमाला देशभरातील विद्यार्थ्यांचा प्रचंड पाठिंबा मिळाला. लाखो तरुणांनी शिक्षण व्यवस्थेवरील त्यांचे सादरीकरण पाहिले आणि त्यांचे विचार मांडले. राहुल गांधी म्हणाले की, शिक्षणाचा सतत वाढणारा खर्च देशातील लाखो कुटुंबांसाठी मोठी समस्या बनला आहे. लाखो कुटुंबे आपल्या मुलांना नीट सारख्या परीक्षांची तयारी करून घेण्यासाठी मोठी रक्कम खर्च करत आहेत. ही परिस्थिती चिंतेचा विषय आहे आणि यावर राष्ट्रीय स्तरावर चर्चा व्हायला हवी. ते म्हणाले की, शिक्षण, रोजगार आणि परीक्षा प्रणालीशी संबंधित मुद्दे कोणत्याही एका राजकीय पक्षाचे नाहीत, तर संपूर्ण देशाचे मुद्दे आहेत.